MHWS08001381-2024

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१६४/२०२४**
**रंजना ..वि.. अमोल मधील नि.क्र.१३ खालील आदेश**

अर्जदार हिने सदरचा अर्ज भा.ना.सु.सं. कलम १४४ अन्वये अंतरीम पोटगी रक्कम रुपये २०,०००/– दरमहा मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की,**

**०२.** अर्जदार ही गैरअर्जदार ची कायदेशीर पत्नी आहे. त्यांचा विवाह दि.२२/०५/२०११ रोजी समाजातील रितीरिवाजानुसार मौजे गोभणी, ता. रिसोड, जि. वाशिम येथे झालेला आहे. सदर लग्नसंबंधातून अर्जदारास गैरअर्जदारापासून दोन मुले नामे प्रतिक व तुषार ही झालेली आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या लग्नामध्ये अर्जदाराच्या आईवडील व मामा यांनी गैरअर्जदार यांना रु.१,००,०००/– दिले. अर्जदाराच्या अंगावर रु.१,००,०००/– चे सोन्या चांदीचे दागदागिने घातले तसेच रु.१,००,०००/– च्या भेटवस्तू दिल्या. तसेच लग्नाचा खर्च रु.२,००,०००/– केला व अर्जदारांनी गैरअर्जदाराचा मानपाण केला.

**०३.** लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदायला गेल्यानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगले नांदवीले. त्यानंतर घरातील लहाण सहाण कारणांवरुन शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबीक हे अर्जदारास तुला स्वयंपाक पाणी येत नाही, तसेच घरातील कामधंदा येत नाही असे म्हणून मारहाण व शिवीगाळ करीत असत. तसेच गैरअर्जदार हा अर्जदारास दारु पिवून शिवीगाळ व मारहाण करीत असत

तसेच अर्जदारास 'तू मला पसंद नाही, माझे जबरदस्तीने तुझेशी लग्न लावून दिले आहे', असे म्हणून अपमाणीत करत असत. अर्जदाराचे सुषमा चंद्रकिरण इंगाले हिच्यासोबत अनैतिक संबंध असून सन २०२४ मध्ये गैरअर्जदार सुषमा चंद्रकिरण इंगाले हिला घरी घेवून आला. अर्जदाराने गैरअर्जदाराला सुषमा इंगाले हिच्यासोबत अनैतिक संबंध ठेवण्यापासून अडविले असता गैरअर्जदाराने अर्जदार हिला बेदम मारहाण केली. सदर घटनेची तक्रार अर्जदार हिने मेहकर येथे दिली आहे. गैरअर्जदाराला सुषमा चंद्रकिरण इंगाले हिच्यासोबत अनैनिक संबंध ठैवण्यासाठी त्याची आत्या व आतेभाउ प्रोत्साहीत करत असत. सुषमा चंद्रकिरण इंगाले हिच्या वडिलांनी गैरअर्जदाराला त्याची मुलगी घरी आणून घालण्याविषयी नोटीस पाठविली होती. तरी सुध्दा गैरअर्जदार व सुषमा इंगाले हे एकमेकांसोबत राहत होते व त्यादरम्यान गैरअर्जदार हा अर्जदाराला म्हणाला की, तुझी मला आता गरज नाही, माझे घरातून चालती हो, नाहीतर तुला जीवाने मारुन टाकीन, असे म्हणून मुलांना हिसकावून घेवून अपमाणीत करुन धमकी देवून अर्जदार हिला घराबाहेर काढून दिले. त्यानंतर अर्जदाराचे वडील हे मुलांना भेटायला आल्यावर गैरअर्जदारांनी त्यांना परत आमच्या गावात आले तर तुमचे हातपाय तोडून झाडावर लटकविण्यात येतील अशी धमकी दिली. त्यामुळे अर्जदारास माहेरी येण्यास पर्याय राहिला नाही. त्यानंतरही अर्जदाराचे आईवडीलांनी गैरअर्जदारा व त्याच्या कुटुंबीयांनी अर्जदारास नांदायला घेवून जावे म्हणून स्वतः व नातेवाईकांमार्फत प्रयत्न केले. परंतु गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय हे अर्जदारास नांदायला घेवून गेले नाहीत. त्यामुळे अर्जदार ही अत्यंत व्यथीत झाली व सदर घटनेचा रिपोर्ट अर्जदार हिने पोलीस स्टेशन, मेहकर येथे दिला.

**०४.** अर्जदार जेव्हापासून तिच्या माहेरी मौजे मसलापेन, ता. रिसोड, जि. वाशिम येथे राहत आहे. तेव्हापासून गैरअर्जदार व त्यांच्यावतिने अर्जदारास भेटण्यासाठी व

घेण्यासाठी कुणीही आले नाही. गैरअर्जदाराने अर्जदार हिला कोणतेही कारण नसतांना दुर्लक्षीत केले आहे. तसेच गैरअर्जदाराने अर्जदार हिची खाण्यापिण्याची, राहण्याची, कपडेलत्याची व औषधोपचाराची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदाराला सदर बाबीसाठी दरमहा रु.३०,०००/– एवढा खर्च लागतो. तो खर्च करण्यास अर्जदार ही असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदार हा महाराष्ट्र परिवहन महामंडळ येथे वाहक म्हणून नोकरीवर असून त्यापासून त्याला दरमहा रु.४०,०००/– मिळतात. तसेच मेहकर येथे कमर्शिअल प्लॅट देखील आहेत. गैरअर्जदारावर अर्जदाराव्यतिरीक्त अन्य कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अंतरिम खावटी म्हणून गैरअर्जदार हा अर्जदार हिला दरमहा रु.२०,०००/– सहज देवू शकतो व अर्जदाराने तशी विनंती केली आहे.

**०५.** गैरअर्जदार याने सदर अर्जावर नि.क्र.१२ वर म्हणणे दिले असून अर्जदार ही गैरअर्जदार ची कायदेशीर पत्नी आहे व त्यांचा विवाह दि.२२/०५/२०११ रोजी समाजातील रितीरिवाजानुसार मौजे गोभणी, ता. रिसोड, जि. वाशिम येथे झालेला आहे. तसेच लग्नसंबंधातून अर्जदारास गैरअर्जदारापासून दोन मुले नामे प्रतिक व तुषार ही झालेली आहेत, याबाबत कोणताही वाद नसल्याचे कथन केले आहे. तसेच सदर अर्जातील इतर मजकूर नाकबूल केला आहे. गैरअर्जदाराचे कथन की, अर्जदार व गैरअर्जदार यांनी गेल्या दहा वर्षापासून संसार सुखाने केला होता व गेल्या चार वर्षापूर्वीपासून अर्जदार ही गैरअर्जदारापासून विभक्त राहत आहे. गैरअर्जदार हे नोकरीला असल्याकारणाने ते कधी रात्री तर कधी दिवसा नोकरी करत असत त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार हे घरी राहत नसल्याचा गैरफायदा घेवून गावातील ऋषिकेश अरुण मानघाले यांच्यासोबत अनैनिक संबंधामुळे गैरअर्जदाराचे घर सोडून त्याच्यासोबत घर सोडून निघून गेली होती. अर्जदार हिने मुलांचा विचार न करता अनैतिक संबंध ठेवून भविष्याचा विचार

न करता चुकीचे पाउल उचलले होते. अर्जदाराचे वडील यांनी दि.०४/०९/२०२० रोजी रितसर अर्जदार ही घरातून निघून गेल्याबाबत तक्रार दिलेली होती.

**०६.** त्यानंतर गैरअर्जदार हे नोकरीला असल्याने नुकसान होईल म्हणून अर्जदाराने ती गैरअर्जदाराकडे राहत नसतांना देखील पोलीस स्टेशन मेहकर येथे कुठलाही वाद झाला नसतांना केवळ गैरअर्जदाराला त्रास देण्याच्या उद्देशाने दि.२३/०६/२०२४ रोजी खोटी तक्रार दाखल केली आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या चुकांबद्दल त्यांच्या नातेवाईकांकडे सांगितले तरी देखील अर्जदार हिला तिचे संसारात वीष पेरुन स्वतःचे, मुलांचे व गैरअर्जदाराचे नुकसान करुन घ्यायचे आहे. गैरअर्जदाराने वारंवार अर्जदाराला बोलुन समजून सांगण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार ही समजण्यास तयार नव्हती व नाही. तरी देखील गैरअर्जदार हे अर्जदाराला नांदविण्यास तयार आहे. गैरअर्जदार हे अर्जदार व त्यांना दोन मुल आहेत व त्यांचे भविष्य चांगले होईल या उद्देशाने प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. गैरअर्जदाराने अर्जदार हिला नांदावयास येणेबाबत नोटीस पाठविली होती व सदर नोटीसबाबत माहिती असून देखील अर्जदार नांदायला गेली नाही.

**०७.** गैरअर्जदाराने पुढे कथन की, गैरअर्जदाराचे आई वडील हे वयोवृध्द असून ते नेहमी आजारी असतात व त्यांच्या औषध पाण्याची व दवाखाण्याची सर्व जबाबदारी ही गैरअर्जदारावरच आहे. त्यामुळे गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थीती बिकट आहे. याउलट अर्जदार ही स्वतः कमावती आहे तसेच अर्जदार ही शिलाई मशीनचा व्यवसास करते आणि त्या व्यावसायातून तिला दरमहा रु.१५,०००/– उत्पन्न सहज मिळते. तसेच अर्जदार ही तिच्या आईवडिलांची शेती सुध्दा पाहते व त्यापासून तिला गैरअर्जदारापेक्षा जास्त उत्पन्न आहे. त्यामुळे अर्जदारास सदरचा खावटीचा अर्ज करण्यास कोणताही कायदेशीर अधिकार

नाही. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार व त्यांच्या कुटुंबीयांना 'तुमच्यावर खोटी फौजदारी केस करुन तुम्हाला जेलात घालीन' अश्या धमक्या देत असे. असे असले तरी अर्जदार हिने गावातील प्रतिष्ठीत लोकांना घेवून चांगले राहण्याची हमी देवून नांदावयास आल्यास गैरअर्जदार आजही नांदविण्यास तयार आहे. परंतु अर्जदार ही तिच्या इच्छेने मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे तिची गैरअर्जदारासोबत नांदण्याची इच्छा दिसत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी गैरअर्जदाराने विनंती केली आहे.

**०८.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनानुसार खालील मुद्दे विचारार्थी आले, त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार ही विनंती प्रमाणे गैरअर्जदाराकडुन दरम्यानची अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**०९.** अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. गवळी व गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. आर. डोंगरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**१०.** प्रस्तुत अर्ज त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जात अर्जदाराने व गैरअर्जदार यांने एकमेकांविरूद्ध वेगवेगळे आरोप प्रत्यारोप केलेले आहेत. त्याबाबत सत्यता पडताळण्याकरिता सदर प्रकरणी चौकशी होऊन उभयतांबद्दल योग्य तो पूरावा नोंदवून निर्णय दिला जाणार आहे. मात्र अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असून ती

सद्य परिस्थितीत तिच्या माहेरी राहण्यास आहे. याबाबत गैरअर्जदार यांचेमार्फत विरोध झालेला नाही.

**११.** सदरचा अर्ज हा अर्जदाराने अंतरीम पोटगीसाठी दाखल केला असल्याने अर्जदाराने गैरअर्जदारासोबतचे नातेसंबंध व गैरअर्जदाराचे उत्पनाबाबत कोणते साधन आहे का हे शाबीत करणे जरुरीचे आहे. अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी असून ती सद्या तिच्या माहेरी राहत असलेबाबत तसेच दरम्यानच्या काळात गैरअर्जदार यांच्याकडून अर्जदार हिच्या पालनपोषणाची किंवा त्या अनुषंगाने लागणा–या संभाव्य खर्चाची कोणतीही व्यवस्था गैरअर्जदार यांच्यामार्फत करण्यात आलेली नाही. अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाविषयी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. मात्र गैरअर्जदाराने तो महाराष्ट्र परिवहन महामंडळ येथे वाहक म्हणून नोकरीस असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे गैरअर्जदार याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते. याउलट अर्जदार ही सक्षम अथवा कमवती आहे, याबबात गैरअर्जदारामार्फत कोणताही पुरावा दाखल केला नाही.

**१२.** अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे. तीच्या पालनपोषणाची, वस्त्र निवा–याची, औषध–पाण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदाराची आहे, हे नजरेआड करुन चालणार नाही. गैरअर्जदार हा स्वतः पालन पोषणासोबतच अर्जदाराचे पालनपोषणासाठी देखील नैतीक व कायदेशीरदृष्टया जबाबदार आहे. यास्तव, केवळ गैरअर्जदार याची आर्थीक पात्रता लक्षात घेवून चालणार नाही तर अर्जदाराच्या मुलभूत व प्राथमीक गरजांचा विचार करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचे प्रकरणाचा गुणदोषावर अंतीम निकाल होण्यास अवधी लागण्याची शक्यता आहे व तोपर्यत कोणत्याही आर्थीक स्वरुपाचे मागणी शिवाय

अर्जदार ही प्रस्तुतचे न्याय प्रकरण चालविण्यासाठी परिस्थीती निर्माण करणे म्हणजेच भविष्यात मिळणा–या भक्कम व सबळ मागणीसाठी अर्जदार हिला सदरच्या परिस्थीतीत उपाशीपोटी न्यायालयीन लढाई लढण्यास परिस्थीती निर्माण करण्यासारखे होईल, असे झाल्यास कायदयाचा व मुळ अर्जाचा हेतु सफलतेस जाणार नाही व त्यायोगे अर्जदारावर अन्याय होण्याची दाट शक्यता आहे. अर्जदार हिला मिळणारी अंतरीम पोटगी ही सदरचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून अर्जदार हिला देणे न्यायोचीत होणार आहे. अर्जदाराचे वय, त्यासाठी लागणा–या अत्यावश्यक व मुलभुत गरजा, त्यांच्या पुर्ततेसाठी लागणारी संभावीत खर्चाची रक्कम, महागाई तसेच अर्जदार हिला मिळणारे उत्पन्न या इतर बाबींचा सारासार विचार करुन गैरअर्जदार हा अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी तीन हजार रूपये फक्त) अंतरीम पोटगी म्हणून देण्यास जबाबदार आहे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यास आदेशीत करण्यात येते की, त्याने सदर अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्ज निकाली होईपर्यंत अर्जदार हिस अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रूपये ३,०००/– (अक्षरी तीन हजार रूपये फक्त) दयावेत.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विना मोबदला देण्यात यावी.

DINESH MUKUND GAIKWAD
Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.02.03 13:34:38 +0530

रिसोड.
दिनांक १५–०१–२०२६

**(दिनेश मु. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२,रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original **Judgment.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | B. V. Bhisade (Grade III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 15.01.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 27.01.2026 |
| Order uploaded on | : | 03.01.2026 |